ePaper “होर्मुझ सामुद्रधुनीवरील बंदी अस्वीकार्य”, पंतप्रधान नरेंद्र मोदी

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 24 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 2 वरुन...

धामणी उपसा सिंचन योजनेला वीजजोडीची आशा

## पुढील 5 दिवसांसाठी वीज प्रकल्पांवर हल्ल्यांना स्थगिती; ट्रम्प यांची मोठी घोषणा

# अमेरिका-इराण युद्धाला 'ब्रेक'

महाईन्यूज । नवी दिल्ली

**इराणसोबत सुरू असलेलं युद्ध थांबवण्यासाठी आता अमेरिकेनं एक पाऊल मागे घेतलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केलाय की इराण आणि अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी शस्त्रसंधीबाबत गेल्या दोन दिवसात चर्चा केलीय. यामुळे पुढच्या पाच दिवसात अमेरिकेकडून इराणच्या कोणत्याही ऊर्जा ठिकाणांवर हल्ले केले जाणार नाहीत. अमेरिकेच्या या निर्णयामुळे युद्ध थांबण्याच्या दिशेनं सकारात्मक चर्चा सुरू झाल्याचं म्हटलं आहे.**



### पावर प्लांटवरील हल्ले 5 दिवसांसाठी पुढे ढकलले

डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये सांगितले की, गेल्या दोन दिवसांत अमेरिका आणि इराण यांच्यात सकारात्मक चर्चा झाली असून, पुढील एक आठवडा ही चर्चा सुरू राहणार आहे. मी अमेरिकेच्या संरक्षण विभागाला इराणच्या वीज प्रकल्प आणि ऊर्जा पायाभूत सुविधांवर होणारे सर्व लष्करी हल्ले पाच दिवसांसाठी स्थगित करण्याचे निर्देश दिले आहेत, अशी माहिती ट्रम्प यांनी दिली. तसेच, मध्यपूर्वेतील तणाव पूर्णपणे संपवण्यासाठी दोन्ही देशांमध्ये गंभीर चर्चा सुरू असल्याचा दावा त्यांनी केला.

डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं की, इराणसोबत गेल्या दोन दिवसांपासून सकारात्मक अशी चर्चा झाली. याचा उद्देश मध्य पूर्वेत सुरू असलेल्या संघर्षावर तोडगा काढणं हा आहे. दोन्ही देशांनी या चर्चेकडं सकारात्मक पद्धतीने पाहिलंय. आठवडाभर ही चर्चा सुरू राहील. मी अमेरिकेच्या संरक्षण विभागाला आदेश दिलेत की इराणच्या पॉवर प्लांट आणि ऊर्जा प्रकल्पांवर पुढचे पाच दिवस हल्ले टाळण्यात यावेत.

हल्ले थांबवण्याचा निर्णय हा इराणसोबत पुढच्या चर्चेत काय घडलतं त्यावर अवलंबून आहे असंही डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितलं. ट्रम्प यांनी रविवारी इशारा दिला होता की जर ४८ तासात इराणने होर्मुझची वाहतूक पूर्ववत केली नाही तर पॉवर प्लांट आणि ऊर्जा प्रकल्प उद्ध्वस्त केले जातील. दरम्यान, आता दोन्ही देशांकडून शांततेसाठी हालचाली सुरू झाल्यानं जगभरातून सुटकेचा निश्वास टाकला जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून मध्य पूर्वेत सुरू असलेल्या युद्धामुळे जगभरात महागाई भडकण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. इराणने ट्रम्प यांच्या इशाऱ्यावर कठोर प्रतिक्रिया देत म्हटलं होतं की, आमच्या पायाभूत सुविधांवर हल्ल्याचे परिणाम आखाती देशांना भोगावे लागतील. जर आमच्या वीज प्रकल्पांना टार्गेक टेलं तर आम्ही आखाती देशातील महत्त्वाच्या इन्फ्रास्ट्रक्चरवर हल्ले करू असा इशाराही इराणने दिला होता.

अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठी घोषणा केली आहे. इराणवरील लष्करी हल्ले तात्पुरते थांबवण्यात आले असून, पुढील निर्णय चर्चेनंतर घेतला जाईल, असे ट्रम्प यांनी जाहीर केले आहे.



# धामणी उपसा सिंचन योजनेला वीजजोडीची आशा

## मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार धामणी येथील उपसा सिंचन योजनांची पाहणी

**महाईन्यूज । आंबेगाव**

**परिसरातील ऊपसा सिंचन योजनेला वीजजोड देण्याच्या प्रश्नासंदर्भात मुख्यमंत्र्यांच्या आदेशावरून महावितरणचे मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी धामणी येथे भेट देऊन पहाणी केली व शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेतल्या.**



धामणी ता. आंबेगाव येथील शेतकऱ्यांच्या उपसा सिंचन योजनेला वीजजोड देण्याच्या प्रश्नासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशावरून पुणे विभागाचे महावितरणचे मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी आज सोमवारी धामणी येथे भेट देऊन उजवा कालवा तसेच शेतकऱ्यांच्या विहिरीवर प्रत्यक्ष जाऊन पहाणी केली तसेच शेतकऱ्यांचे म्हणणे जाणुन घेतले याबाबत लवकरच मुख्यमंत्र्यांना अहवाल सादर करणार असल्याने परिसरातील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहे.

तालुक्याच्या पुर्वभागात दुष्काळी गाव म्हणुन ओळख असलेल्या धामणी गावातील शेतकरी एकत्र येत लाखो रुपये खर्च करून सामुदायिक उपसा सिंचन योजना राबवण्यास सुरुवात केली परंतु राज्यात यापुढे शेतीपंपासाठी नवीन वीज जोड देणे बंद केले त्यामुळे धामणी परिसरात एकूण सुमारे साडेतीन ते चार कोटी रुपये खर्च करून सुरु होत असलेल्या नऊ उपसा सिंचन योजना अडचणीत आल्या आहे. या सर्व उपसा सिंचन योजनांना शासनाने विशेष बाब म्हणून तातडीने वीज जोड द्यावा या मागणीसाठी सुमारे ३०० ग्रामस्थ एक दिवशीय लाक्षणिक उपोषणास बसून शासनाचे लक्ष वेधले होते. प्रश्न मार्गी लागला नाहीतर आंदोलन तीव्र करण्याचा ग्रामसभा घेऊन ग्रामस्थांनी निर्धार केला होता.

या आंदोलनाची तातडीने दखल घेऊन सुरू असलेल्या विधानसभा अधिवेशनात मंगळवार (दि.१०) रोजी माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी धामणी येथील शेतकऱ्यांचा प्रश्न आक्रमकपणे मांडुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष वेधले.

यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देत मुख्य अभियंत्यांना १५ दिवसांत प्रत्यक्ष जागेवर जाऊन निर्णय घेण्याचे आदेश दिले होते त्यानुसार आज सोमवारी मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी धामणी येथे भेट देऊन डिंभा उजवा कालव्यावर प्रायोगीक तत्वावर बसवलेल्या सोलर सिस्टिमची पाहणी केली दुर अंतरावर असलेल्या विहिरीत किती दाबाने पाणी पडते याची विहिरीवर जाउन पाहणी केली. शेतकऱ्यांच्या वतीने माजी पंचायत समिती सदस्य रविंद्र करंजखेले यांनी शेतकऱ्यांच्या समस्या सांगितल्या यावेळी परिसरातील शेकडो शेतकरी उपस्थित होते.

यासंदर्भात लवकरच मुख्यमंत्री यांना अहवाल सादर केला जाईल असे मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी सांगितले. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या हक्काच्या पाण्यासाठी आणि शेती वाचवण्यासाठी दिलेल्या लढ्याला अखेर यश आले आहे.

या आंदोलनाची तातडीने दखल घेऊन सुरू असलेल्या विधानसभा अधिवेशनात मंगळवार (दि.१०) रोजी माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी धामणी येथील शेतकऱ्यांचा प्रश्न आक्रमकपणे मांडुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष वेधले.

यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देत मुख्य अभियंत्यांना १५ दिवसांत प्रत्यक्ष जागेवर जाऊन निर्णय घेण्याचे आदेश दिले होते त्यानुसार आज सोमवारी मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी धामणी येथे भेट देऊन डिंभा उजवा कालव्यावर प्रायोगीक तत्वावर बसवलेल्या सोलर सिस्टिमची पाहणी केली दुर अंतरावर असलेल्या विहिरीत किती दाबाने पाणी पडते याची विहिरीवर जाउन पाहणी केली. शेतकऱ्यांच्या वतीने माजी पंचायत समिती सदस्य रविंद्र करंजखेले यांनी शेतकऱ्यांच्या समस्या सांगितल्या यावेळी परिसरातील शेकडो शेतकरी उपस्थित होते.

यासंदर्भात लवकरच मुख्यमंत्री यांना अहवाल सादर केला जाईल असे मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी सांगितले. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या हक्काच्या पाण्यासाठी आणि शेती वाचवण्यासाठी दिलेल्या लढ्याला अखेर यश आले आहे.

# पुणे रिंगरोड प्रकल्प 25 टक्के पूर्ण; वाहतूक कोंडीला दिलासा

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे रिंगरोड या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या कामाला वेग आला असून, सुमारे 25 टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती एमएसआरडीसी अधीक्षक अभियंता राहुल वसईकर यांनी दिली. पुण्याच्या रिंगरोडचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. यासंदर्भात शासनाकडून देखील वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे. राज्यातील पायाभूत सुविधांच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात असून, भविष्यात पुण्याच्या वाहतूकव्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार आहे.**



पुणे शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या लक्षात घेता वाहतूक कोंडी ही मोठी समस्या बनली आहे. या पार्श्वभूमीवर रिंगरोड प्रकल्पामुळे शहराबाहेरील वाहतूक थेट वळविणे शक्य होणार आहे. त्यामुळे शहरातील मुख्य रस्त्यांवरील ताण कमी होऊन प्रवास अधिक जलद आणि सुलभ होईल. या रिंगरोडमुळे पुणे जिल्ह्यातील विविध तालुके तसेच औद्योगिक क्षेत्रे एकमेकांशी अधिक प्रभावीपणे जोडली जाणार आहेत. विशेषतः मुंबई-बंगळुरू महामार्ग, नगर रोड, सोलापूर रोड यांसारख्या प्रमुख मार्गांना जोडणारी ही रिंगरोड कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत करणार आहे. त्यामुळे मालवाहतूक आणि प्रवासीवाहतूक दोन्हीमध्ये वेळेची बचत होणार आहे. दरम्यान, प्रकल्पाच्या उर्वरित कामासाठी प्रशासनाने गती वाढवली असून, येत्या काही वर्षांत संपूर्ण रिंगरोड पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. एकूणच, पुणे रिंगरोड हा प्रकल्प शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

### पुणे रिंगरोड महत्त्वाचे मुद्दे

- सध्या प्रकल्पाचे सुमारे 25 टक्के काम पूर्ण
- वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महत्त्वाचा प्रकल्प
- बाहेरील (हायवे) वाहतूक शहरात न येता थेट वळवता येणार प्रवासाचा वेळ आणि इंधनखर्च कमी होणार
- कनेक्टिव्हिटीसंदर्भात मुंबई-बंगळुरू महामार्ग, नगर रोड, सोलापूर रोड यांसारख्या प्रमुख मार्गांना थेट जोडणी
- जिल्ह्यातील तालुके, औद्योगिक क्षेत्रे एकमेकांशी अधिक जवळ येणार
- मालवाहतूक जलद, सुलभ होणार
- विकासाच्या दृष्टीने ग्रामीण भागात नवीन विकासाच्या संधी

> रिंगरोडच्या उभारणीमुळे शहराच्या उपनगरांमध्ये आणि ग्रामीण भागात विकासाच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. औद्योगिक गुंतवणूक वाढण्यास चालना मिळेल तसेच रिअल इस्टेट क्षेत्रालाही मोठी गती मिळण्याची शक्यता आहे. यामुळे रोजगारनिर्मितीस हातभार लागणार आहे. काम गतीने सुरू आहे. कमीत कमी वेळेत हा प्रकल्प पूर्ण करणे आमचा प्रयत्न आहे.
>
> - राहुल वसईकर, अधीक्षक अभियंता, एमएसआरडीसी

# दरवाढीचा खवय्यांच्या खिशाला फटका!

## उत्पादन खर्च वाढल्याने वडापावचे दर वाढले; विद्यार्थी व चाकरमान्यांना आर्थिक ताण

**महाईन्यूज । भोसरी**

**शहरातील विद्यार्थी, खवय्ये तसेच चाकरमानी वर्गासाठी नेहमीच स्वस्त, सहज उपलब्ध आणि पोटभरणारा पर्याय म्हणून ओळखला जाणारा वडापाव आता महाग होत चालल्याचे चित्र दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांत वडापावच्या दरात वाढ झाल्यामुळे अनेकांच्या दैनंदिन खर्चावर थेट परिणाम होत आहे. साधारणपणे १५ रुपयांत मिळणारा वडापाव आता २० रुपयांपर्यंत पोहोचला असून, यामुळे ग्राहकांच्या खिशाला चांगलाच फटका बसत आहे.**



वडापाव हा फक्त एक खाद्यपदार्थ नसून तो शहराच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. विशेषतः शाळा-कॉलेजमधील विद्यार्थी, कामावर जाणारे कर्मचारी आणि प्रवासात असणारे नागरिक यांच्यासाठी वडापाव हा जलद, किफायतशीर आणि सहज मिळणारा पर्याय मानला जातो. कमी वेळात पोट भरण्यासाठी आणि कमी खर्चात भूक भागवण्यासाठी अनेकजण वडापाववर अवलंबून असतात. त्यामुळे दरवाढीचा परिणाम मोठ्या प्रमाणावर जाणवत आहे.

शहरातील विविध भागांतील वडापाव विक्रेत्यांनी या दरवाढीमागील कारणे स्पष्ट करताना सांगितले की, बटाटा, तेल, गॅस, भाजीपाला तसेच इतर कच्च्या मालाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. तसेच भाडे, वीजबिल आणि कामगार खर्चही वाढल्यामुळे त्यांच्यावर आर्थिक ताण वाढला आहे. या वाढत्या खर्चामुळे नाइलाजास्तव वडापावच्या किमती वाढवाव्या लागत असल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे.

मात्र, ग्राहकांकडून या दरवाढीबद्दल नाराजी व्यक्त केली जात आहे. “दररोजचा खाऊ म्हणून वडापाव घेत होतो, पण आता खर्च वाढत आहे,” अशी प्रतिक्रिया अनेक विद्यार्थ्यांनी दिली. काही चाकरमानी वर्गातील नागरिकांनीही सांगितले की, रोजच्या प्रवासात वडापाव हा सोयीचा पर्याय होता, पण आता त्याऐवजी इतर स्वस्त खाद्यपदार्थांचा विचार करावा लागत आहे.

दरवाढीमुळे वडापावसारखा सर्वसामान्यांचा आवडता आणि परवडणारा पर्याय हळूहळू महाग होत चालल्याचे स्पष्ट होत आहे. यामुळे ग्राहक आणि विक्रेते या दोघांनाही आर्थिक ताण सहन करावा लागत आहे. भविष्यात कच्च्या मालाच्या किमती स्थिर झाल्यास वडापावचे दर पुन्हा कमी होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### उत्पादन खर्चवाढीचा परिणाम

गॅस टंचाईचा पार्श्वभूमीवर काही दिवसांत वडापावच्या किमतीत 3 ते 5 रुपयांची वाढ करण्यात आली असून, स्वस्त आणि पोटभर खाण्यासाठी अनेकांचा पर्याय असल्याने आता तोही महाग झाला आहे. यामुळे ग्राहकांच्या खिशाला चांगलाच फटका बसत आहे. विशेषतः कामगार, विद्यार्थी आणि दैनंदिन उत्पन्नावर जगणाऱ्या नागरिकांसाठी ही दरवाढ चिंतेची बाब ठरत आहे. गॅसटंचाई, वाढलेले एलपीजी दर तसेच कच्च्या मालाच्या किमतीत झालेली वाढ यामुळे उत्पादन खर्च वाढला आहे.

### महागाईच्या कचाट्यात सापडला वडापाव

सध्या शहरात वडापाव 15 ते 25 रुपयांच्या दरम्यान विकला जात असून, परिस्थिती अशीच राहिली तर दरात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारा हा लोकप्रिय पदार्थ आता हळूहळू महागाईच्या कचाट्यात सापडणार तर नाही ना, असा विचार नागरिकांच्या मनात घर करत आहे.

---

## नागरिकांच्या अडचणी प्राधान्याने सोडविणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी : महापौर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा अधिक सक्षम, जलद आणि परिणामकारक पद्धतीने उपलब्ध झाल्या पाहिजेत. शहरातील नागरिकांच्या अडचणी प्राधान्याने सोडविणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असून, सुरू असलेल्या विकासकामांना गती देणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन शहराचे महापौर रवि लांडगे यांनी केले.**



इ क्षेत्रीय कार्यालयातील संत ज्ञानेश्वर महाराज सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या बैठकीस विधी समितीच्या सभापती राणी माई पठारे, माजी महापौर तथा नगरसदस्य नितीन काळजे, नगरसदस्या सारीका गायकवाड, अर्चना सस्ते, श्रुती डोळस, नानी उर्फ हिराबाई घुले, भिमाबाई फुगे, कविता भोंगाळे, प्रा. सोनाली गव्हाणे तसेच नगरसदस्य सचिन तापकीर, कृष्णा सुरकुले, उदय गायकवाड, सागर गवळी, जालिंदर शिंदे, विराज लांडे उपस्थित होते.

याशिवाय आरोग्य विभागाचे उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, क्षेत्रीय अधिकारी तानाजी नरळे, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे यांच्यासह सहाय्यक आरोग्य अधिकारी, कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ अभियंता तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीत आरोग्य, स्थापत्य, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, कर संकलन, विद्युत तसेच इतर महत्त्वाच्या विभागांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. शहरातील विविध भागांत नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या, प्रलंबित कामे तसेच सुरू असलेल्या विकास प्रकल्पांची सद्यस्थिती यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.



### प्रलंबित कामे पूर्ण करण्याचे आदेश

नगरसदस्यांनी मांडलेल्या विविध स्थानिक समस्या तसेच नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे, स्वच्छता व आरोग्य सेवा अधिक कार्यक्षम करणे, जलनिस्सारण व्यवस्थेत सुधारणा करणे आणि शहरातील पायाभूत सुविधांच्या कामांना गती देणे, यावर विशेष भर देण्यात आला.प्रलंबित कामे लवकर पूर्ण करून नागरिकांना दिलासा देणे तसेच प्रत्येक विभागाने परस्पर समन्वय ठेवून कार्य करावे, असे स्पष्ट निर्देश महापौरांनी दिले. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित सुविधा अधिक सक्षम व प्रभावी करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.



## भूमिका

**राज्यातील सार्वजनिक जीवनात स्वच्छता, पारदर्शकता आणि नैतिकतेचे मापदंड टिकवणे ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक जबाबदार नागरिकाचीही प्राथमिक जबाबदारी आहे. अशा पार्श्वभूमीवर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना पदावरून दूर करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला.**

# अंधश्रद्धेच्या सावटाखालील सत्ता



हा निर्णय केवळ “उपचार” आहे की “रोगमुक्ती”ची खरी सुरुवात, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो.

चाकणकर यांची नियुक्तीच मुळात प्रश्नचिन्ह निर्माण करणारी होती. महिला सक्षमीकरण, स्त्रीहक्क किंवा सामाजिक कार्यातील भक्कम योगदान यांपैकी कोणत्या निकषावर त्यांची निवड झाली, याचे समाधानकारक उत्तर कधीच समोर आले नाही. त्यामुळे त्यांची हकालपट्टी ही एका चुकीच्या निर्णयाची उशिराने केलेली दुरुस्ती म्हणावी लागेल. पण केवळ एका व्यक्तीवर कारवाई करून संपूर्ण व्यवस्थेतील दोष झाकले जाऊ शकत नाहीत.

या प्रकरणातील अधिक गंभीर मुद्दा म्हणजे तथाकथित ‘बाबा’ अशोक खरात याच्या वाढत्या प्रभावाचा. समाजात अशा व्यक्तींना उगवण्याची संधी मिळतेच कशी? हा प्रश्न केवळ सामाजिक नसून राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्थेवरही बोट ठेवतो. उपलब्ध माहितीनुसार, अनेक सत्ताधारी नेते, मंत्री आणि विविध पक्षांचे पदाधिकारी या व्यक्तीच्या संपर्कात होते. काहींनी तर त्याच्या ‘आशीर्वादासाठी’ सार्वजनिकरित्या हजेरी लावली होती.

हे चित्र केवळ एका पक्षापुरते मर्यादित नाही. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गट असो किंवा इतर राजकीय गट, सर्वच स्तरांवर अंधश्रद्धेचे प्रदर्शन होताना दिसते. नेता ज्या ठिकाणी डोके टेकवतो, तेथे त्याचे अनुयायी अधिकच अंधपणे झुकतात. त्यामुळे नेत्यांकडून विवेक, वैज्ञानिक दृष्टी आणि सामाजिक जबाबदारीची अपेक्षा अधिक असते. परंतु वास्तवात याच्या नेमक्या उलट चित्र पाहायला मिळते.

अंधश्रद्धेचा हा विस्तार नवीन नाही. याआधीही अनेक राजकीय नेते तथाकथित बाबांच्या प्रभावाखाली आल्याची उदाहरणे आहेत. अशोक चव्हाण यांनी मुख्यमंत्रीपदाच्या काळात ‘वर्षा’ निवासस्थानी केलेली बाबांची पूजा असो किंवा इतर नेत्यांची अशा घटनांमधील उपस्थिती—या सर्व गोष्टी समाजातील चुकीच्या प्रवृत्तींना खतपाणी घालतात. यामुळे सामान्य नागरिकांमध्येही अंधश्रद्धा वाढीस लागते.

या पार्श्वभूमीवर, केवळ चौकशी पथक स्थापन करणे हा उपाय अपुरा ठरतो. राज्य सरकारने तेजस्विनी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली विशेष चौकशी पथक नेमले असले तरी अशा पथकांचा इतिहास फारसा समाधानकारक नाही. अनेकदा या चौकशा ‘क्लीन चिट’ देऊनच संपतात. त्यामुळे या वेळी ठोस आणि निष्पक्ष कारवाई होणे आवश्यक आहे.

यासाठी पहिला टप्पा म्हणजे या संपूर्ण प्रकरणात सहभागी असलेल्या सर्व राजकीय नेत्यांवर आणि संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करणे. महाराष्ट्रात लागू असलेला अंधश्रद्धा निर्मूलन कायदा यासाठी प्रभावी ठरू शकतो. परंतु दुर्दैवाने, या कायद्याचा वापर क्वचितच केला जातो. हा कायदा केवळ कागदावरच मर्यादित राहू नये, यासाठी सरकारने सक्रिय भूमिका घेणे गरजेचे आहे.

तसेच, आर्थिक बाबींची चौकशीही तितकीच महत्त्वाची आहे. खरात याच्या नावावर असलेली कोट्यवधींची मालमत्ता ही केवळ योगायोग असू शकत नाही. अशा संपत्तीमागे आर्थिक व्यवहार, भागीदारी आणि सत्ताधाऱ्यांचे पाठबळ असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ईडी आणि सीबीआय यांसारख्या संस्थांनीही या प्रकरणात पुढाकार घेणे आवश्यक आहे.

## प्रासंगिक »

### कष्टाची कमाई श्रेष्ठ

***एका नगरात दोन चोर राहत होते. ते दररोज चोरी करून मिळालेल्या मालाचे दोन भाग करत, एक स्वतःसाठी आणि दुसरा ईश्वराला अर्पण करत. एके दिवशी त्यांना चोरीची संधीच मिळाली नाही, त्यामुळे ते थकून मंदिराच्या ओट्यावर बसले.***

तेथे त्यांना एक संत भेटले. संतांनी त्यांना त्यांच्या कामाबद्दल विचारले असता त्यांनी प्रामाणिकपणे सर्व सांगितले. चोरांना वाटत होते की ते चांगले काम करत आहेत, कारण ते ईश्वराला वाटा देत होते. संतांनी त्यांना समजावण्यासाठी आपल्या झोळीतून एक जिवंत कोंबडा काढून दिला आणि सांगितले की याचे दोन भाग करा, एक स्वतःसाठी आणि दुसरा ईश्वरासाठी. हे ऐकून चोरांना आपली चूक लक्षात आली. जिवंत प्राण्याचे दोन भाग करणे अशक्य आहे, तसेच चोरीचे पापही ईश्वराला अर्पण करता येत नाही, हे त्यांना उमगले. त्यांनी संतांना वचन दिले की पुढे ते प्रामाणिकपणे कष्ट करून कमाई करतील आणि त्यातील काही भाग ईश्वराला अर्पण करतील.

**तात्पर्य-** पापाची कमाई असंतोष आणि दु:खाचे कारण बनते तर कष्टाची कमाई मानसिक सुख, शांतता आणि आत्म्याला सुख देते.

निसर्गाच्या बदलत्या चक्रामुळे आणि लहरी हवामानामुळे अलीकडच्या काही वर्षांत शेतीसमोर गंभीर आव्हाने उभी राहिली आहेत. महाराष्ट्रात मागील काही दिवसांपासून सुरू असलेला अवकाळी पाऊस आणि गारपीट हे त्याचे ठळक उदाहरण आहे.

# निसर्गाचे बदलते चक्र की संकटाचे वारे?



महाराष्ट्रात मागील काही दिवसांपासून सुरू असलेला अवकाळी पाऊस आणि गारपीट हे त्याचे ठळक उदाहरण आहे. पूर्वी पावसाळा ठराविक काळातच यायचा, मात्र आता ‘नेहमीच अवकाळी पाऊस’ अशी स्थिती निर्माण होत आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून त्यांच्या उपजीविकेवर परिणाम होत आहे.

राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये रब्बी पिकांची काढणी सुरू असताना या अवकाळी पावसाने मोठा फटका दिला आहे. गहू, हरभरा यांसारख्या पिकांसह कांदा, मका, ज्वारी, आंबा, केळी, द्राक्षे, डाळिंब आणि भाजीपाला यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. विशेषतः अहिल्यानगर जिल्ह्यात सर्वाधिक हानी झाली असून हजारो हेक्टरवरील पिके जमीनदोस्त झाली आहेत. एकूण 30 तालुक्यांतील सुमारे 6 हजार 900 हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. पूर्वी गारपीट हा दुर्मीळ आणि आनंददायी अनुभव मानला जात असे. मात्र आता तिचे स्वरूप पूर्णतः बदलले असून ती संकटाचे प्रतीक बनली आहे. यामागे हवामानातील बदल आणि त्याची वाढती तीव्रता कारणीभूत आहे. देशातील विविध भागांमध्ये निर्माण होणाऱ्या हवेच्या दाबातील बदल, द्रोणीय स्थिती आणि वातावरणातील अस्थिरता यामुळे महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये गारपीट आणि अवकाळी पाऊस होत आहे. याशिवाय जागतिक पातळीवरील हवामानातील बदलांचाही भारतीय मान्सूनवर मोठा परिणाम होत आहे. प्रशांत महासागरातील ला निनोचा प्रभाव कमी होत असून पुढील काळात एल निनो सक्रिय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एल निनोमुळे पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता असते, ज्यामुळे दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण होऊ शकते. यामुळे शेती, पिण्याचे पाणी आणि एकूण अर्थव्यवस्थेवर परिणाम होऊ शकतो. भारतीय शेती प्रामुख्याने मान्सूनवर अवलंबून असल्यामुळे हवामानातील अशा बदलांचा परिणाम थेट शेतकऱ्यांवर होतो. आधीच महागाई, इंधन दरवाढ आणि इतर आर्थिक समस्यांमुळे सामान्य नागरिक अडचणीत आहे. त्यातच अवकाळी पाऊस, गारपीट आणि संभाव्य एल निनो यामुळे चिंतेत भर पडली आहे. एकूणच, हवामानातील अस्थिरता ही आता तात्पुरती समस्या न राहता दीर्घकालीन संकट बनत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पिकांचे संरक्षण उपाय आणि पर्यायी शेती पद्धती स्वीकारणे आवश्यक आहे. तसेच शासनानेही ठोस धोरणे आखून शेतकऱ्यांना मदत करणे गरजेचे आहे. बदलत्या निसर्गचक्राचा सामना करण्यासाठी दीर्घकालीन नियोजन करणे हीच काळाची गरज आहे.

## ।। अभंगवाणी ।।



**समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ।**
**तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥१॥**
**आणीक न लगे मायिक पदार्थ ।**
**तेथें माझें आर्त्त नको देवा ॥ध्रु.॥**

**- संत तुकाराम**


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सातार्‍यातील गोंधळावरून विधीमंडळात घमासान

## मंत्र्यांनाही फरफटत नेले; मंत्री शंभूराज देसाई यांनी सभागृहात मांडली आपबिती

**महाईन्यूज । मुंबई**

**सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष निवड प्रक्रियेदरम्यान झालेल्या गोंधळाचे प्रतिबिंब सोमवारी विधान परिषदेत उमटले. सभागृहात दिवसभर वेगवेगळ्या प्रकारे सातारा जिल्हा परिषदेचा प्रश्न उपस्थित होत राहिला. सातारा जिल्हा पोलिस अधिक्षकांसह अन्य पोलिस अधिकार्‍यांना निलंबित करण्याचा उपसभापती निलम गोर्‍हे यांचा निर्णय सभापती प्रा. राम शिंदे यांनी राखून ठेवला. निर्णय राखून ठेवण्यावर सत्ताधारी शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्री, सदस्यांसह काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या सदस्यांनी जोरदार आक्षेप घेतला.**



### मंत्री गोरे यांचे विरोधकांवरच आरोप

वस्तूस्थिती समजून घ्या. ज्या सदस्यांचे अपहरण झाले, तो राष्ट्रवादीचा आहे. गुन्हा दाखल केला, तो त्याचा मुलगा आहे. जिल्हा परिषदेचे निवडणूक प्रक्रियेदरम्यान सदस्य सोडून अन्य कुणीही तिथे गेले नाही पाहिजे. मंत्री, लोकप्रतिनिधींना वेगळे नियम नाहीत. जिल्हा परिषदेत पोलिस असताना हजारो लोकं कशी आत गेली. जिल्हा परिषदेच्या परिसरात तीन, चार हजार लोकांचा जमाव कोणी जमविला होता. अधिकार्‍यांचे निलंबन रद्द करा, अशी मागणी गोरे यांनी केली. यावेळी मंत्री गोरे आणि उपसभापती गोर्‍हे यांच्यात शाब्दिक वाद झाला.

विधान परिषदेचे कामकाज सकाळी दहा वाजता सुरू होताच हेमंत पाटील, विक्रम काळे औचित्याच्या मुद्द्याद्वारे सातारा जिल्हा परिषदेत झालेल्या गोंधळाचा प्रश्न उपस्थित केला. अनिल परब, भाई जगताप, सचिन आहीर, संजय खोडके, मनिषा कायंदे, प्रविण दरेकर, शशिकांत शिंदे आदींनी चर्चेत सहभाग घेतला.

आंतरवली सराटीत गोळीबार आणि लाठीहल्ला केलेला पोलिस अधिकारी तुषार दोशी सध्या सातार्‍याचा पोलिस अधीक्षक आहे. हा जातीयवादी, पक्षपाती आहे. त्याचे आजच्या आज निलंबन झाला पाहिजे. सदस्यांना मतदान करू न देणे, ही घटनेची पायमल्ली आहे. मतदानाच्या अगोदरच्या दिवशी सायंकाळी सहा वाजता गुन्हा नोंद होतो.

संबंधित सदस्य मतदानासाठी आल्यावर त्यांना दहा ते बारा पोलिसांनी अडविले. मंत्री, पालकमंत्री, लोकप्रतिनिधींना घेराव घातला. माझ्या चाळीस वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत असा अनुभव आला नव्हता. आम्ही निवडणूक पूर्व आघाडी केली होती. शिवसेना – राष्ट्रवादी ६५ पैकी ३७ जागा जिंकल्या, ३३ सदस्य मतानाला चाललो होतो.

पण, दोन सदस्यांवर गुन्हे दाखल केले. एक सदस्याचे अपहरण झाल्याचा गुन्हा नोंद झाला. अपहरणाचा गुन्हा नोंद झालेला सदस्य आमच्या सोबत होता. तरीही आम्हाला धक्काबुक्की करण्यात आली. सध्या वेशातील शंभर पोलिस कर्मचारी जिल्हा परिषदेत काय करत होते. मला फरफरटत नेले. खासदार नितीन जाधव यांना पायर्‍यावरून खाली पाडले. मंत्री मकरंद जाधव जबरदस्तीने बाहेर काढले. सभागृहाच्या प्रवेशद्वारापासून आमच्या दोन सदस्यांना फरफटत बाहेर घेऊन गेले.

पोलिस अधिक्षक तुषार दोशी घरगड्यासारखा वागला आहे. त्याच्यासह स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलिस निरीक्षक देवकर, सहाय्यक पोलिस निरीक्षकांसह शंभर पोलिसांवर कारवाई करून निलंबित करा. घडलेल्या घटनेची उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांकडून चौकशी करा, अशी आग्रही मागणी पर्यटन मंत्री, तथा सातार्‍याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केली. त्यानंतर तुषार दोशी आणि संबंधित पोलिस अधिकारी, पोलिस कर्मचार्‍यांनी निलंबित करण्यात यावे, असे आदेश उपसभापती निलम गोर्‍हे यांनी दिला.

उपसभापतींच्या आदेशांचे सरकार तंतोतंत पालन करेल, अशी ग्वाही मंत्री उदय सामंत यांनी दिली. त्यानंतर सभापती प्रा. राम शिंदे आसनस्थ झाल्यानंतर मकरंद जाधव, मनिषा कायंदे, अनिल परब, भाई जगताप आदींनी घटनेवर जोरदार आक्षेप घेतला. दरम्यान प्रवीण दरेकर यांनी विधानसभेत झालेल्या घडामोडी आणि उपसभापतींना असे निर्देश देण्याचे अधिकार आहेत का, असा प्रश्न उपस्थित केला. अखेर सभापती शिंदे यांनी निलंबनाचा गोर्‍हे यांचा निर्णय राखून ठेवल्याची घोषणा केली. त्याला सत्ताधारी शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेससह विरोधी बाकावरील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या सदस्यांनी जोरदार आक्षेप घेतला.

# भोंदु अशोक खरातच्या अत्याचाराचा नाशिकमध्ये पाढा वाचला!

**महाईन्यूज । नाशिक**

**महिलांचे लैंगिक शोषण करणार्‍या भोंदू अशोक खरातचा पाय अधिक खोलात जात आहे. खरातविरूध्द तक्रार करणार्‍यांची संख्या वाढू लागली असून सोमवारी सायंकाळपर्यंत त्याच्याविरुध्द दाखल गुन्ह्यांची संख्या सहापर्यंत पोहचली.**



युवतीवर लग्नाआधी आणि लग्नानंतर अशोक खरातने नाशिक येथील त्याच्या कार्यालयात अत्याचार केले. याविरोधात पीडितेने सरकारवाडा पोलीस ठाण्यात तक्रार केल्यावर गुन्हा दाखल झाला. यानंतर खरात यास अटक झाली. त्याच्या अटके नंतर राजकिय तसेच सामाजिक पटलावर अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला.

दुसरीकडे या पहिल्या घटनेने बळ मिळाल्या मुळे पीडित महिलेच्या पतीने खरात याच्या विरूध्द सरकारवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करत खरात याच्या दुष्कृत्याचा पाढा वाचला. तक्रारदाराची पत्नी गर्भवती असतांना तिला बाळाच्या उज्वल भवितव्यासाठी पुजा करायची असे सांगत कार्यालयात बोलावले. तिच्या सोबत गैर वर्तन करत तिला शारिरीक इजा होईल अशी कृती केली. या विरोधातत सरकारवाडा पोलीस ठाण्यात दुसरा गुन्हा दाखल झाला.

काही तासाच्या आतच घटस्फोटीत महिलेने खरात याच्या विरूध्द तिसरा गुन्हा सरकारवाडा पोलीस ठाण्यात दाखल केला. पिडीत महिलेचे लग्न जमवणे, संसारात येणार्‍या अडचणी विषयी त्यांना विचारणा केली. तुझ्या आयुष्यात घटस्फोट आहे तर माझ्या आयुष्यात दोन लग्न आहे. मी तुझ्याशी लग्न करणार. तुझ्या दोन्ही मुलांचा मी सांभाळ करेल असे सांगत तिच्यावर वारंवार शारिरीक अत्याचार केले. या मध्ये महिला गरोदर राहिल्यानंतर जबरदस्तीने तिचा गर्भपात करण्यात आला. या प्रकाराविरोधात सरकारवाडा पोलीस ठाण्यात तिसरा गुन्हा दाखल झाला.

या सर्व पार्श्वभूमीवर खरातच्या अत्याचाराला बळी पडलेल्यांनी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, त्यांनी भीती बाळगू नये, असे आवाहन नाशिक पोलिसांकडून करण्यात आल्यावर पीडिता तक्रारीसाठी पुढे येऊ लागल्या. सोमवारी अजून तीन पीडितांनी पोलिसांकडे आपली कैफियत मांडली. अशाप्रकारे खरातविरूध्द आतापर्यंत सहा गुन्हे दाखल झाले आहेत.

खरातविरूध्द तक्रार करण्यासाठी पीडितांनी निर्भयपणे समोर यावे. त्यांची ओळख गुप्त ठेवण्यात येईल. यासंदर्भात पोलीस उपअधीक्षक किरणकुमार सूर्यवंशी, पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे, निरीक्षक राहुल मोरे यांच्याशी ९५०३२७०२२४, ७७७५८१६३८९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन विशेष तपास प्रमुख तेजस्वी सातपुते यांनी केले आहे.

# होर्मुझ सामुद्रधुनीवरील बंदी अस्वीकार्य

## ऊर्जा संकटावर मात कशी करणार? मोदींची सभागृहात महत्त्वाची माहिती!

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**“हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद करणे स्वीकारार्ह नाही,” अशा कडक शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज लोकसभेत आपली भूमिका स्पष्ट केली. पश्चिम आशियातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या ऊर्जा संकटाचा सामना करण्यासाठी भारत सज्ज असून, सामान्यांच्या स्वयंपाकघरापर्यंत याची झळ पोहोचू देणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**



### भारताची रणनीती काय?

भारतातील कच्चे तेल, गॅस आणि फर्टिलायजरासारख्या अनेक महत्त्वाच्या गोष्टी होर्मुझ सामुद्रधुनीतून येतात. युद्धामुळे या मार्गावरून जहाजांची हालचाल आव्हानात्मक झाली आहे. त्यामुळे पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा पुरवठा खंडित होऊ नये. देशातील सामान्य नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून सरकार मदत करत आहे. देश आपल्या गरजेच्या ६० टक्के एलपीजी आयात करतो. अनिश्चिततेच्या कारणामुळे एलपीजीच्या घरगुती वापराला प्राथमिकता दिली आहे. एलपीजीच्या देशातील उत्पादनाला वाढवलं जात आहे. पेट्रोल डिझेलचा पुरवठा सुरळीत व्हावा म्हणून काम केलं जात आहे.

“पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षावर आधीच भारताने गंभीर चिंता व्यक्त केली आहे. पश्चिम आशियातील सर्व देशातील संबंधित नेत्यांशी मी चर्चा केली आहे. मी स्वतः हा तणाव कमी करून थांबवण्याचा आग्रह केला आहे. भारताने भारतीय नागरीक, ऊर्जा आणि वाहतुकीशी संबंधित हल्ल्यांचा विरोध केला आहे. व्यावसायिक जहाजांवरील हल्ला आणि होर्मुझ सामुद्रधुनीसारख्या आंतरराष्ट्रीय जलमार्गावरील बंदी अस्वीकार्य आहे. भारत डिप्लोमसीप्रमाणे युद्धाच्या परिस्थितीतही जहाजांच्या हालचालींकरता निरंतर प्रयत्न करत आहे. भारत प्रत्येकवेळी मानवतेच्या हिताकरता आणि शांतीच्या बाजूने आवाज उठवत राहिला आहे. संवाद आणि कुटनीतीतच या समस्येचं समाधान आहे. आमचा प्रत्येक प्रयत्न तणाव कमी करून संघर्ष संपवण्यासाठी आहे”, असं मोदी म्हणाले.

“या युद्धात कोणत्याही जीवनावरील संकट मानवतेच्या हिताचं नाही. त्यामुळे भारताचा प्रयत्न सर्व पक्षांना लवकरात लवकर शांतीपूर्व समाधानाकरता प्रोत्साहित करत आहे. असे संकट येतात तेव्हा काही तत्त्वे याचा गैरफायदा उचलण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे सुरक्षा यंत्रणांना हायअलर्टवर ठेवण्यात आले आहे. सागरी सुरक्षा, सीमा सुरक्षा, सायबर सुरक्षा मजबूत केल्या जात आहेत. या युद्धामुळे जगातील कठीण परिस्थिती दीर्घकाळ राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपल्याला तयार राहावं लागेल आणि एकजूट राहावं लागेल. आपण करोनाच्या वेळीही एकजुट राहून काम केलं. आताही त्याचप्रमाणे तयार राहण्याची गरज आहे. संयम, धैर्याने, शांत मनाने सामना करायचा आहे. हीच आपली ओळख आहे”, असंही खास आवाहन नरेंद्र मोदी यांनी केलं.

“ऊर्जा सुरक्षेला घेऊन गेले एक दशकात उचलेले पावलं अधिक प्रासंगिक झाले आहेत. भारताने गेल्या ११ वर्षांत ऊर्जा आयातीची विभागणी केली आहे. पूर्वी कच्चे तेल, एलएनजी, एलपीजी २७ देशांतून आयात केली जात होती. आता भारत ४१ देशांतून ऊर्जा साधने आयात करतो. गेल्या दशकभरात भारताने संकटाच्या अशाच काळात कच्च्या तेलाच्या साठवणुकीला प्राधान्य दिलं आहे. आज भारतात ५३ लाख मेट्रिक टन अधिक स्ट्रॅटजिक पेट्रोलिअम राखीव आहे. तर, ६५ लाख मेट्रिक टन राखीव ठेवता येईल, याकरता देश काम करत आहे. आपल्या तेल कंपन्यांकडे जे राखीव असतं ते वेगळं आहे. तर, गेल्या १२ वर्षांत रिफायनरिंग कॅपासिटीमध्येही उल्लेखनीय वृद्धी झाली आहे. अनेक देशांशीही सरकार संपर्कात आहे. जिथून शक्य होईल, तिथून तेल आणि गॅसची आयात होत राहील”, असं आश्वासनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलं.

भारत सरकार आखाती देशातील शिपिंग रूट्सवर लक्ष ठेवून आहे. तेल, गॅस, फर्टिलायजर वाहणारे जहाज भारतात सुरक्षित पोहोचत आहेत. आम्ही आमच्या जगातील सहयोगांबरोबर निरंतर संवाद साधत आहोत. यामुळे मेरिटाईम कोरिडोर सुरक्षित राहतील. या प्रयत्नांमुळेच होर्मुझ सामुद्रधुनीत अडकेलेल अनेक जहाज भारतात आले आहेत”, असं मोदी म्हणाले.

संकटाच्या या काळात देशातील एक तयारी प्रचंड कामाला येत आहेत. गेल्या १०-१२ वर्षांत इथेनॉलच्या उत्पादनासाठी अभूतपूर्व काम झालं आहे. दहा वर्षांपूर्वी फक्त १ डेड पर्सेंट वेल्डिंग कॅपासिटी होती. आता २० डेड पर्सेट वेल्डिंग इथेनॉल निर्मित होत आहे. त्यामुळे प्रतिवर्ष साडेचार कोटी बॅरल तेल कमी आयात करावं लागतं. यामुळे रेल्वेच्या वीजेकरता फायदा होत आहे. नाहीतर दरवर्षी आपल्याला जवळपास १८० कोटी लीटर डिझेल अतिरिक्त लागलं असते. आम्ही मेट्रोचं नेटवर्क वाढवलं आहे. २०१४ मध्ये मेट्रोचं जाळं २५० किमीपेक्षाही कमी होतं. आता ११०० किमीपेक्षा जास्त मेट्रो नेटवर्क झालं आहे. आम्ही इलेक्ट्रिक मोबालिटीवर भर दिला आहे. आज ज्या प्रमाणात वैकल्पिक इंधनावर काम होतंय, त्यामुळे भारताचे भविष्य अधिक सुरक्षित होईल”, असं आश्वासन नरेंद्र मोदी यांनी दिलं.

---

## १४.२ किलोच्या एलपीजी सिलिंडरमध्ये १० किलो गॅस भरुन दिला जाणार?

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**मध्य पूर्वेतील वाढत्या तणावाचा परिणाम आता थेट सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरावर दिसू लागला आहे. इस्त्रायल, अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक अडथळ्यात आली असून, भारताच्या तेल आणि गॅस पुरवठ्यावर त्याचा दबाव वाढला आहे. परिणामी, देशातील एलपीजी साठा झपाट्याने घटत असल्याची माहिती समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर सरकारी तेल कंपन्या पर्यायी उपाययोजनांवर काम करत आहेत.**




### भारताची आयात

भारत आपल्या एकूण एलपीजी गरजेपैकी सुमारे ६० टक्के गॅस आयात करतो, ज्यापैकी जवळपास ९० टक्के पुरवठा आखाती देशांकडून होतो. सध्याच्या भू-राजकीय परिस्थितीमुळे या पुरवठा साखळीवर मोठा परिणाम झाला आहे. इस्त्रायल, अमेरिका आणि इराण यांच्यातील तणावामुळे आखाती प्रदेशातून भारतात येणाऱ्या मालवाहू जहाजांची संख्या घटली आहे. गेल्या आठवड्यात भारतात केवळ दोन एलपीजी जहाजे दाखल झाली आहेत. याशिवाय, अनेक भारतीय एलपीजी टँकर अजूनही पर्शियन आखातात अडकून पडले आहेत, ज्यामुळे पुरवठा व्यवस्थेवर आणखी ताण निर्माण झाला आहे.

दरम्यान, सोशल मीडियावर असा दावा केला जात आहे की, सरकार घरगुती एलपीजी सिलिंडरमधील गॅसचे प्रमाण कमी करण्याचा विचार करत आहे. या दाव्यानुसार, सध्या १४.२ किलो गॅस असलेल्या सिलिंडरमध्ये केवळ १० किलो गॅस देण्याची योजना आखली जात आहे, जेणेकरून मर्यादित साठा अधिकाधिक घरांपर्यंत पोहोचवता येईल.

मात्र, केंद्र सरकारने हा दावा स्पष्टपणे फेटाळून लावला आहे. पेट्रोलियम मंत्रालयाने पत्रकार परिषदेत सांगितले की, १४.२ किलोच्या सिलिंडरमधील गॅस १० किलोपर्यंत कमी करण्याचा कोणताही प्रस्ताव किंवा विचार सध्या सरकारच्या स्तरावर सुरू नाही. तसेच, नागरिकांनी अशा अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीकडेच लक्ष द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

१४.२ किलो क्षमतेचे घरगुती एलपीजी सिलिंडर १० किलो क्षमतेच्या एलपीजी सिलिंडरमध्ये रूपांतरित केल्याच्या वृत्तांवर, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा म्हणाल्या, “ही निव्वळ अफवा आहे आणि कोणत्याही अफवांवर भाष्य किंवा स्पष्टीकरण दिले जाऊ शकत नाही. अफवांवर विश्वास ठेवू नका.”

# अनुष्का शर्मा करणार कमबॅक?



अभिनेत्री अनुष्का शर्माने अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. मात्र तिच्या मुलांच्या जन्मानंतर तिनं अभिनय क्षेत्रापासून ब्रेक घेतला. सध्या ती लंडनमध्ये राहत असून मुलांचं संगोपन करत असल्याचं म्हटलं जातं. मात्र आता ती आठ वर्षानंतर पुन्हा एकदा सिनेसृष्टीत कमबॅक करणार आहे. अल्लू अर्जुन त्याच्या AA22XA6 या आगामी बिग बजेट चित्रपटातून झळकणार आहे. हा एक सायन्स फिक्शन चित्रपट असून याचे नाव बदललं जाणार आहे. एटली या चित्रपटाचं दिग्दर्शन करत आहे. एका वृत्तानुसार दीपिका पादुकोण चित्रपटात मुख्य अभिनेत्रीच्या भूमिकेतून झळकणार आहे. तर यात अनुष्का शर्मा देखील दिसणार असल्याचे म्हंटले जात आहे. हा तिचा पहिला तेलुगू चित्रपट असणार आहे. तर अल्लू अर्जुन आणि अनुष्का पहिल्यांदाच स्क्रीन शेअर करतील.



## "मी रडायचे, खूप त्रास व्हायचा.."

# ट्रोलिंगवर श्रीलीलाची कबुली

तेलुगू अभिनेत्री श्रीलीला 'उस्ताद भगत सिंग' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात ती अभिनेता पवन कल्याणसोबत स्क्रिन शेअर करताना दिसणार आहे. त्यामुळे चाहते या चित्रपटाची वाट पाहत आहेत. मनोरंजन विश्वातील कलाकारांना अनेकदा एखाद्या गोष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर ट्रोल केले जाते. यावर अनेक कलाकारांनी आपले मते व्यक्त केली आहेत.

आता नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत श्रीलीलाने ट्रोलिंगबद्दल आणि या गोष्टीचा तिच्यावर कसा परिणाम होतो याबद्दल आपले मत व्यक्त केले आहे. तिने चित्रपटसृष्टी सोडण्याचा विचार का केला होता, हेदेखील तिने यावेळी बोलताना स्पष्ट केले. सुमा कनकवाला यांच्या 'द रील फ्लेवर' या चॅट शोमध्ये श्रीलीला ट्रोलिंगमुळे त्रास होतो का, असा प्रश्न तिला विचारण्यात आला होता. या प्रश्नाचे उत्तर देताना अभिनेत्री म्हणाली, "जेव्हा मी इंडस्ट्रीत नवीन होते, तेव्हा खूप त्रास व्हायचा." पुढे ती म्हणाली, मला खूप वाईट वाटायचे, मी रडायचे. मी माझ्या आईला हेही म्हणाले होते, "मला नाही वाटत की मी हे करू शकेन. मी पुन्हा शाळेत किंवा कॉलेजला जाऊ का? मी खूप संवेदनशील होते, पण आता मला काही फरक पडत नाही. खरंतर तिच्या मनात इंडस्ट्री सोडण्याचा विचार घोळत होता, पण काळ जसा पुढे सरकत गेला तसा तिने याकडे दुर्लक्ष केले असे तिने यावेळी बोलताना स्पष्ट केले. श्रीलीला पुढे म्हणाली, "मला वाटते की आजकालच्या लोकांमध्ये स्वतःची बुद्धिमत्ता असते. म्हणूनच, नकारात्मकता दिसली तरी ते कमी विचार करतात. आजकालच्या लोकांमध्ये पूर्वीपेक्षा जास्त बुद्धिमत्ता आहे. म्हणूनच ते जास्त विचार करतात."




# रॅम्पवर अदितीचा जलवा

मुंबईत पार पडलेल्या एका भव्य फॅशन वीकमध्ये अभिनेत्री अदिती राव हैदरी हिने आपल्या स्टाइल आणि आत्मविश्वासाने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं. या कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी अदितीने रॅम्पवर चालताना असा काही जादू निर्माण केला की उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. मात्र, या सगळ्यात जास्त चर्चेत राहिला तो तिचा आणि तिचा पती अभिनेता सिद्धार्थ यांचा खास क्षण. अदितीने या फॅशन शोसाठी मिडनाइट ब्लू रंगाचा अतिशय आकर्षक लेहेंगा परिधान केला होता. तिच्या लेहेंग्यावर बारीक डिझाइन आणि हलकासा फ्लो असलेला स्कर्ट तिच्या लुकला वेगळेपण देत होता. यासोबत तिने डीप नेक असलेला ब्रालेट-स्टाइल ब्लाऊज घातला होता, ज्यामुळे तिचा लुक पारंपरिक असूनही मॉडर्न दिसत होता. विशेष म्हणजे, या पारंपरिक पोशाखावर तिने एक लांब ट्रेंच कोट घालून फॅशनला एक नवीन टच दिला.

# शकीराचा भारतातील कॉन्सर्ट रद्द



ग्रॅमी पुरस्कार विजेती जागतिक पॉप गायिका शकीराचा भारतातील कॉन्सर्ट रद्द करण्यात आला आहे. इराण व इस्रायल यांच्यातील सध्याच्या संघर्षामुळे हा कॉन्सर्ट आयोजित केला जाणार नाही, अशी माहिती आयोजकांनी सोशल मीडियावर दिली आहे. 'फिडिंग इंडिया कॉन्सर्ट' उपक्रमाचा एक भाग म्हणून, ZOMATO आणि DISTRICT यांच्या संयुक्त विद्यमाने शकीराच्या कॉन्सर्टचे आयोजन करण्यात आले होते. हा कॉन्सर्ट १०-११ एप्रिल रोजी मुंबईत आणि १५ एप्रिल रोजी दिल्लीत होणार होता.

परंतु इराण-इस्रायल युद्धाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या कारणास्तव हा कॉन्सर्ट होणार नाही. हा कार्यक्रम आता कधी होईल, याबाबत कोणतीही अधिकृत तारीख जाहीर करण्यात आलेली नाही, ज्यामुळे चाहत्यांची मोठी निराशा झाली आहे. आयोजक संस्था 'DISTRICT'ने इन्स्टाग्रामवर एक सविस्तर पोस्ट करत लिहिले की, "सध्याची जागतिक भू-राजकीय परिस्थिती आणि प्रादेशिक तणावामुळे, शकीराची 'फिडिंग इंडिया' हा कॉन्सर्ट पुढे ढकलण्यात आला आहे. आमचे चाहते, कलाकार आणि प्रोडक्शन टीम सुरक्षा व संरक्षण ही आमच्यासाठी सर्वात महत्वाचे आहे. 'DISTRICT' ने जाहीर केले की, ते नवीन तारखा लवकरच जाहीर करतील. शिवाय, ज्यांनी कोणी तिकिटे खरेदी केली आहेत, त्यांना तिकिटांचे पैसे परत मिळतील. ही रक्कम त्यांनी ज्या माध्यमातून भरली होती, त्याच माध्यमातून पूर्ण केली जाईल.



# मी ६० वर्षांपर्यंत खेळू शकतो!

## सीएसकेच्या कार्यक्रमात एम एस धोनीने आयपीएल निवृत्तीबाबत वक्तव्य

**महाईन्यूज । चेन्नई**

**आयपीएलच्या १९ व्या हंगामाचे बिगुल वाजण्यापूर्वीच चेन्नई सुपर किंग्सचा 'थला' म्हणजेच महेंद्रसिंग धोनी पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. वयाच्या ४४ व्या वर्षीही धोनीचा उत्साह दांडगा असून, नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात त्याने आपल्या निवृत्तीच्या चर्चांना मिश्किल उत्तर देत चाहत्यांची मने जिंकली. "मी ६० वर्षांपर्यंत आयपीएल खेळू शकतो," असे धोनीने म्हटले आहे.**





चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम स्टेडियमवर रविवारी सीएसकेच्या एका खास फॅन इव्हेंटचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दाक्षिणात्य अभिनेता शिवकार्तिकेयन याने धोनीला गमतीत विनंती केली की, "तू निवृत्तीच्या चर्चांकडे दुर्लक्ष कर आणि जास्तीत जास्त काळ क्रिकेट खेळत राहा." त्यावर हसत हसत धोनी म्हणाला, "हे कठीण आहे... पण मी नक्कीच प्रयत्न करू शकतो!" धोनीचे हे उत्तर ऐकताच संपूर्ण चेपॉक स्टेडियम 'धोनी-धोनी'च्या जयघोषाने दुमदुमून गेले. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

धोनी आता आयपीएल २०२६ मध्ये आपला १९ वा हंगाम खेळण्यासाठी सज्ज झाला आहे. २०२४ मध्ये त्याने नेतृत्वाची धुरा ऋतुराज गायकवाडकडे सोपवली होती, तरीही संघातील त्याचे स्थान अढळ आहे.



चेन्नई सुपर किंग्सच्या या कार्यक्रमादरम्यान, सीएसकेने सुरेश रैना आणि मॅथ्यू हेडन यांना त्यांच्या 'हॉल ऑफ फेम'मध्ये समाविष्ट केलं. फ्रँचायझीद्वारे या प्रतिष्ठित यादीत समाविष्ट होणारे ते पहिले दोन खेळाडू आहेत. सीएसके ३० मार्च रोजी गुवाहाटीमध्ये राजस्थान रॉयल्स (आरआर) विरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करेल.

२०२५ च्या हंगामात चेन्नई सुपर किंग्सची कामगिरी निराशाजनक झाली होती आणि संघ गुणतालिकेत तळाला राहिला होता. यंदा संघात संजू सॅमसनसारख्या नव्या दमाच्या खेळाडूंचा समावेश झाला आहे. त्यामुळे यष्टिरक्षणाची जबाबदारी वाटून घेतली जाण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत धोनीचा अनुभव संघाला पुन्हा उभारी देण्यासाठी मोलाचा ठरणार आहे.

### IPL २०२६ शेवटचा हंगाम ठरणार?

धोनीच्या भविष्याबाबत क्रीडाविश्वात सतत चर्चा सुरू असतात. सीएसकेचे सीईओ काशी विश्वनाथन यांनी स्पष्ट केले आहे की, धोनी २०२६ च्या पूर्ण हंगामात खेळणार आहे, मात्र त्याची भूमिका काहीशी वेगळी असू शकते. गेल्या काही हंगामांपासून धोनीच्या भूमिकेत स्पष्ट बदल दिसले आहेत. तो आता कर्णधार नाही. 'फिनिशर' म्हणून तो फलंदाजीसाठी खूप खालच्या क्रमांकावर येतो. 'इम्पॅक्ट प्लेयर' नियमामुळे त्याचा शारीरिक ताण कमी झाला आहे.

## आयसीसीकडून 'प्लेअर ऑफ द मंथ'ची घोषणा; अरुंधतीची ऐतिहासिक कामगिरी

**महाईन्यूज । दुबई**

**आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) २३ मार्च २०२६ रोजी 'प्लेअर ऑफ द मंथ' पुरस्कारांची घोषणा केली आहे. फेब्रुवारी २०२६ या महिन्यासाठी महिला गटात भारतीय संघाची वेगवान गोलंदाज अरुंधती रेड्डी हिने या प्रतिष्ठेच्या पुरस्कारावर आपले नाव कोरले आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावरील तिच्या विलोभनीय कामगिरीची दखल घेत आयसीसीने तिला या बहुमानाने गौरविले आहे. पुरुष गटात पाकिस्तानच्या खेळाडूने बाजी मारली आहे.**





अरुंधती रेड्डीने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत ८ बळी मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. या मालिकेत तिची सरासरी १०.८७ तर इकॉनॉमी रेट ७.२५ इतका राहिला. विशेषतः सिडनी येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात तिने केवळ २२ धावा देऊन ४ फलंदाजांना तंबूत धाडले होते. या पुरस्कारासाठी श्रीलंकेची हर्षिता समरविक्रमा आणि पाकिस्तानची फातिमा सना यादेखील शर्यतीत होत्या, मात्र त्यांना मागे टाकत अरुंधतीने कारकिर्दीत पहिल्यांदाच 'प्लेअर ऑफ द मंथ'चा किताब पटकावला आहे.

"आयसीसी 'प्लेअर ऑफ द मंथ' म्हणून निवड होणे हा माझ्यासाठी मोठा सन्मान आहे. ऑस्ट्रेलियात टी-२० मालिका जिंकण्यात मोलाचे योगदान देता आले, याचे समाधान अधिक आहे. ऑस्ट्रेलियाला त्यांच्याच भूमीत नमवणे सोपे नसते, त्यामुळे हा पुरस्कार माझ्यासाठी खूप खास आहे. या विजयामुळे आमचा आत्मविश्वास उंचावला असून आगामी महिला टी-२० विश्वचषकातही आम्ही अशीच कामगिरी करू," असे अरुंधतीने पुरस्कार स्वीकारल्यानंतर नमूद केले.

पुरुष गटात पाकिस्तानच्या साहिबजादा फरहान याला फेब्रुवारी महिन्याचा 'प्लेअर ऑफ द मंथ' म्हणून निवडण्यात आले आहे. टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरल्याने फरहानने इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू विल जॅक्स आणि अमेरिकेचा वेगवान गोलंदाज शॅडली वॅन शाल्विक यांना मागे टाकले. वैयक्तिक स्तरावर फरहानची कामगिरी उत्कृष्ट असली तरी, पाकिस्तानचा संघ या विश्वचषकात उपांत्य फेरीपर्यंत मजल मारण्यात अपयशी ठरला होता.

स्मार्ट PCMC
SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। मंगळवार ।
दि. 24 मार्च 2026।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## महापालिकेतर्फे स्वच्छता मोहीम, जनजागृती आणि पाणी बचतीची सामूहिक प्रतिज्ञा

# पवना नदी काठावर 'जागतिक जल दिन' उत्साहात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**जागतिक जल दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभाग व पाणीपुरवठा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट, पिंपरी यांच्या सहकार्याने रावेत बंधारा येथील पवना नदी काठावर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.**





कार्यक्रमाची सुरुवात जागतिक जल दिनाचे महत्त्व, पाण्याचे संवर्धन, जलस्रोतांचे वाढते प्रदूषण तसेच नदी, नाले आणि पाणवठ्यांच्या स्वच्छतेची गरज याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून करण्यात आली. त्यानंतर नदीकाठ व परिसरात स्वच्छता मोहीम राबवून प्रत्यक्ष कृतीद्वारे जनजागृती करण्यात आली.

या उपक्रमादरम्यान उपस्थित सर्वांनी पाण्याची बचत व संवर्धन करण्याची प्रतिज्ञा घेतली. पाणीपुरवठा विभागामार्फत पाणी बचतीचे महत्त्व आणि सध्याच्या काळातील गरज याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. स्वच्छता मोहिमेनंतर महानगरपालिकेचे कर्मचारी व डी. वाय. पाटील कॉलेजचे विद्यार्थी यांनी पवना नदी काठावर जनजागृतीपर रील्स तयार करून या उपक्रमात उत्साहाने सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमास पर्यावरण अभियांत्रिकी विभागाचे कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट, सोहन निकम, उपअभियंता पंकज फेंडे, प्रीती गाडे तसेच पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता महेश बरीदे, उपअभियंता प्रवीण धुमाळ व दोन्ही विभागांचे कनिष्ठ अभियंते उपस्थित होते. तसेच डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजच्या मुख्य समन्वयक डॉ. गौरी पाटील यांनी कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन केले.

> “आजच्या वाढत्या शहरीकरण आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पाण्याचे संवर्धन ही केवळ गरज नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी बनली आहे. नदी, नाले आणि जलस्रोत स्वच्छ ठेवणे, पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि पुढील पिढ्यांसाठी पाणी जतन करणे आवश्यक आहे. अशा जनजागृती उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून येतो आणि पर्यावरण संरक्षणाला बळकटी मिळते.”
>
> **– संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका.**

## पिंपरी-चिंचवडमध्ये ग्रीन सोसायटींना करसवलत; ‘माझी वसुंधरा’ला गती

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराला स्वच्छ, हरित आणि शाश्वत बनविण्याच्या दिशेने महापालिका प्रभावीपणे काम करत असून, आरोग्य विभागाच्या माझी वसुंधरा 6.0 अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या ग्रीन सोसायटी उपक्रम राबविण्यात येत आहे. हे उपक्रम प्रभावीपणे राबविणाऱ्या सोसायट्यांना 10 ते 15 टक्क्यांपर्यंत करसवलतीचा लाभ मिळणार आहे.**



पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल तसेच उप आयुक्त किरणकुमार मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम शहरभर प्रभावीपणे राबविला जात आहे. रॉयल कॅसल सोसायटीमध्ये वसुंधरा संवर्धनाला केंद्रस्थानी ठेवून विविध प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

कचरा व्यवस्थापन व कंपोस्टिंग प्रकल्पाद्वारे ओल्या कचऱ्याचे खतामध्ये रूपांतर केले जात आहे. रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्पामुळे पावसाच्या पाण्याचे संकलन करून त्याचा पुनर्वापर केला जातो. ग्रे वॉटर प्रकल्पामुळे वापरलेल्या पाण्याचा पुनर्वापर करून पाणी बचतीस हातभार लागतो. तसेच, सौर ऊर्जा प्रकल्पाद्वारे स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ऊर्जेचा वापर करण्यात येत आहे. ‘महापालिकेकडून 5-स्टार सोसायटी’ म्हणून विशेष मानांकन दिले जाते.

तसेच, एकापेक्षा अधिक प्रकल्प प्रभावीपणे राबविणाऱ्या सोसायट्यांना 10 ते 15 टक्क्यांपर्यंत करसवलतीचा लाभ मिळतो. ‘ग’ क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे यांच्या अधिपत्याखाली आरोग्य निरीक्षक स्नेहल सुकटे, आरोग्य सहाय्यक प्रशांत गोठे, प्रदीप सोनवणे यांच्या प्रयत्नांतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

> कचरा व्यवस्थापन, पाणी पुनर्वापर आणि अक्षय ऊर्जेचा वापर या बाबींची अंमलबजावणी ही काळाची गरज आहे. महापालिकेच्या पुढाकारामुळे शहरात वसुंधरापूरक बदल घडत असून, भविष्यातील पिढ्यांसाठी हे उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका**

# हॅकेथॉनमुळे विद्यार्थ्यांमध्ये नवोन्मेषाची जाणीव

## निगडीतील डॉ. अरविंद बी. तेलंग महाविद्यालयात डॉ. सुनील महाजन यांचे प्रेरणादायी व्याख्यान

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. अरविंद बी. तेलंग वरिष्ठ महाविद्यालय, निगडी येथे संगणक शास्त्र (B.SC. CS) विभागाच्या वतीने "TRANSFORMATIVE POWER OF HACKATHON" (हॅकेथॉनची परिवर्तनीय शक्ती) या विषयावर विशेष अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.**



> "हॅकेथॉन ही केवळ स्पर्धा नसून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला, समस्यांवरील उपाय शोधण्याच्या क्षमतेला आणि टीमवर्कला चालना देणारे प्रभावी व्यासपीठ आहे. अशा उपक्रमांत सहभाग घेतल्यास तांत्रिक कौशल्यांसोबतच आत्मविश्वास आणि करिअरच्या नव्या संधीही निर्माण होतात."
> - – डॉ. सुनील महाजन.

महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमाला प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील एकूण ६४ विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी येथील इलेक्ट्रॉनिक्स विषयाचे असोसिएट डीन (स्टुडंट अफेअर्स) डॉ. सुनील महाजन उपस्थित होते.

डॉ. महाजन यांनी आपल्या मार्गदर्शनात हॅकेथॉनमध्ये सहभागी होण्याचे विविध फायदे, तांत्रिक कौशल्यांचा विकास, तसेच करिअर घडविण्यात त्याचे महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली. भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी अशा स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी कशा उपयुक्त ठरतात, हे त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या प्रमुख सहाय्यक प्राध्यापिका राधिका खिस्ते यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सहाय्यक प्राध्यापिका शर्मिला लाड यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथम वर्ष बी.सी.एस.ची विद्यार्थिनी साक्षी वाकोडे हिने केले. शेवटी सहाय्यक प्राध्यापिका प्रज्ञा राजेश्वरकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# उपशिक्षक हनुमंत हुचगोळ यांना 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार'

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत ध्येय एज्युकेशन फाउंडेशन (पाचगणी, जि. सातारा) यांच्या वतीने दिला जाणारा 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५' एम.एस.एस. हायस्कूल, श्रीधरनगर येथील उपशिक्षक हनुमंत देवराम हुचगोळ यांना जाहीर करण्यात आला आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुदाम विठ्ठल शेंडगे यांनी पत्राद्वारे त्यांच्या निवडीची घोषणा केली.**





ध्येय एज्युकेशन फाऊंडेशन(महाराष्ट्र राज्य)
संस्थापक / अध्यक्ष
श्री. सुदाम विठ्ठल शेंडगे
नामांकन पत्र
आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५
प्रति,
मा. शिक्षक/शिक्षिका
हनुमंत देवराम हुचगोळ
विषय: 'आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५' या पुरस्कारासाठी नामांकन
आदरणीय महोदय/महोदया,

> हनुमंत हुचगोळ हे अत्यंत निष्ठावान, उपक्रमशील आणि बहुआयामी शिक्षक आहेत. त्यांच्या ३० वर्षांच्या सेवेत त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच सामाजिक क्षेत्रातही मोलाचे कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याचा सन्मान म्हणून मिळालेला हा पुरस्कार संपूर्ण संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे.
> – इंद्रायणी माटे-पिसोळकर, प्राचार्या.

हनुमंत हुचगोळ यांना शिक्षण क्षेत्रात ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. अध्यापनासोबतच ते उत्कृष्ट निवेदक, सूत्रसंचालक आणि 'स्काऊट मास्टर' म्हणूनही ओळखले जातात. विविध सामाजिक संस्थांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवत त्यांनी समाजकार्यातही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. हा पुरस्कार निगडी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात आयोजित 'ध्येय एज्युकेशन आयकॉन्स समिट २०२५' या राज्यस्तरीय सोहळ्यात प्रदान करण्यात येणार असून कार्यक्रमाची तारीख लवकरच जाहीर होणार आहे.

हुचगोळ यांना यापूर्वीही अनेक सन्मानांनी गौरविण्यात आले आहे. त्यामध्ये भारत स्काऊट गाईड पुणे यांचा 'दीर्घ सेवा पुरस्कार', पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा 'गुणवंत शिक्षक पुरस्कार', मोरया शिक्षण संस्थेचा 'अष्टपैलू पुरस्कार २०२८' व 'लक्षवेधी गुणवंत शिक्षक पुरस्कार २०२५', तसेच 'सकाळ' वृत्तपत्र समूहाचा 'उत्कृष्ट लेखन पुरस्कार २०२५' आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन गौरव पुरस्कार (२०१०) यांचा समावेश आहे.

या निवडीबद्दल मोरया शिक्षण संस्थेचे अध्यक्ष स्वप्निल शेंडगे, कार्यवाह तथा विश्वस्त प्राचार्या इंद्रायणी माटे-पिसोळकर, खजिनदार रणजीत सावंत तसेच शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



# मेट्रो कामामुळे रस्त्यांची दयनीय अवस्था

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील निगडी ते आकुर्डी मार्गावर सुरू असलेल्या मेट्रो बांधकामामुळे रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. चिखल व साचलेल्या बांधकाम साहित्यामुळे हा मार्ग अत्यंत धोकादायक बनला आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना या परिस्थितीचा मोठा फटका बसत असून, किरकोळ अपघातांची मालिका सुरूच आहे. मात्र, गंभीर अपघाताचीदेखील दाट शक्यता वर्तविली जात आहे.**

पिंपरी-चिंचवड शहरात पिंपरी ते भक्ती-शक्ती मार्गात सुरू असलेल्या मेट्रोच्या कामासाठी रस्त्याच्या मधोमध उभारण्यात येणाऱ्या पिलरमुळे अनेक ठिकाणी लोखंडी पत्रे टाकण्यात आली आहेत.

मात्र, ही पत्रे काही ठिकाणी अपुरी पडत असल्याने बांधकामासाठी वापरले जाणारे दगड, विटा, मुरूम आणि वाळू हे थेट रस्त्यावर पसरले आहे. यासोबतच बांधकामासाठी वापरलेले पाणी रस्त्यावर वाहत येऊन चिखल तयार होत आहे. परिणामी रस्ता निसरडा झाला असून वाहन चालवणे धोकादायक ठरत आहे.

दुचाकीस्वारांना विशेषतः संतुलन राखताना मोठी कसरत करावी लागत आहे. अनेकांनी घसरून किरकोळ दुखापती झाल्याच्या घटना समोर येत आहेत. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही याकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

### परिस्थिती गंभीर का?

- रस्त्यावर साचलेला चिखल आणि बांधकाम साहित्य.
- अपुरी सुरक्षा उपाययोजना
- वाहतुकीचा वाढता ताण.
- रात्रीच्या वेळी अपुरा प्रकाश.

# ‘पिंपरी-चिंचवड प्रीमियर लीग 2026’चे महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते शानदार उद्घाटन!

## भोसरीत भव्य क्रिकेट स्पर्धेला सुरुवात; युवकांना क्रीडा कौशल्य दाखविण्याचे व्यासपीठ

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड प्रीमियर लीग या स्पर्धेमुळे भोसरी परिसरातील युवकांना आपली क्रीडा कौशल्ये सादर करण्यासाठी एक सक्षम व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. स्थानिक पातळीवर अशा स्पर्धा सातत्याने आयोजित झाल्यास खेळाडूंमध्ये आत्मविश्वास, स्पर्धात्मकता आणि प्रगतीची प्रेरणा निर्माण होण्यास निश्चितच मदत होईल, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.**



भोसरी येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृहाशेजारील गावजत्रा मैदानावर राजमुद्रा क्रिकेट क्लबच्या वतीने स्वर्गीय अंकुशराव लांडगे यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या पिंपरी चिंचवड प्रीमियर लीग २०२६ या भव्य क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. यावेळी ते बोलत होते. महापौरांच्या हस्ते खेळपट्टीचे पूजन करून स्पर्धेची औपचारिक सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमास आयोजक कैलास लांडगे यांच्यासह मधुकर महाराज साखरे, गणेशभाऊ भालेकर, स्वप्नीलभाऊ लांडगे, आनंदभाऊ चव्हाण, सचिनभाऊ लांडगे, आनंदभाऊ आरबुज, राहुलभाऊ लांडगे, संजयमामा पवार, शिवाजीभाऊ देवकुळे, संतोषभाऊ लांडगे, सतीशभाऊ लांडगे तसेच विविध संघांचे संघमालक, खेळाडू आणि क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना महापौर रवि लांडगे म्हणाले की, क्रिकेटसारख्या खेळांमधून संघभावना, शिस्त, नेतृत्वगुण आणि सकारात्मक दृष्टीकोन विकसित होतो. ही मूल्ये समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असून अशा उपक्रमांमुळे युवकांना सकारात्मक दिशा मिळण्यास मदत होते.

दरम्यान, या स्पर्धेसाठी आकर्षक पारितोषिकांची घोषणा करण्यात आली असून प्रथम क्रमांकासाठी ९१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ७१ हजार रुपये, तर तृतीय व चतुर्थ क्रमांकासाठी प्रत्येकी ५१ हजार रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले आहे. तसेच ‘मॅन ऑफ द सिरीज’ विजेत्यास दुचाकी, तर अंतिम सामन्यातील ‘मॅन ऑफ द मॅच’ खेळाडूस सायकल देऊन गौरविण्यात येणार आहे.

### पीसीपीएल २०२६ : आकर्षक बक्षिसे

स्पर्धेतील विजेत्या संघाला ९१ हजार, उपविजेत्याला ७१ हजार, तर तृतीय व चतुर्थ क्रमांकासाठी प्रत्येकी ५१ हजार रुपयांची बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. ‘मॅन ऑफ द सिरीज’ विजेत्यास दुचाकी, तर अंतिम सामन्यातील ‘मॅन ऑफ द मॅच’ खेळाडूस सायकल देऊन गौरविण्यात येणार आहे.

# २०४७ पर्यंत विकसित भारतासाठी संशोधन महत्त्वाचे : डॉ. यादव

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**कोणतेही संशोधन केवळ प्रयोगशाळा किंवा शैक्षणिक संकुलापुरते मर्यादित न राहता त्याचा समाज, उद्योग आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी प्रत्यक्ष उपयोग झाला पाहिजे, असे प्रतिपादन पद्मश्री व माजी कुलगुरू डॉ. जी. डी. यादव यांनी केले.**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड विद्यापीठात (पीसीयू), साते (वडगाव मावळ) येथे “इनोव्हेशन व उद्योजकता उत्कृष्टता केंद्र” (CIEE) चे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमास पद्मश्री उद्योजक प्रतापराव पवार, एआयसीटीईचे माजी अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा, महाराष्ट्र इनोव्हेशन सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील, पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीयूचे कुलगुरू डॉ. संजय सोनवणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### सुमारे ३०० विद्यार्थ्यांचा सहभाग

कुलगुरू डॉ. संजय सोनवणे यांनी सांगितले की, सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क, सीओईपी टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, आयसीटी मुंबई आणि नॅशनल केमिकल लॅबोरेटरी यांसारख्या संस्थांच्या सहभागामुळे पीसीयूला देशातील अग्रगण्य नवोन्मेष केंद्र म्हणून ओळख मिळण्यास चालना मिळाली आहे. “विद्यापीठ केवळ नोकरी शोधणारे विद्यार्थी तयार करत नाही, तर नोकरी निर्माण करणारे उद्योजक घडवत आहे,” असेही त्यांनी नमूद केले. पद्मश्री प्रतापराव पवार यांनी जागतिक सहकार्य आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला. कार्यक्रमात सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून १५ विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी ग्रामीण उद्योजकतेला चालना देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. ग्रामीण युवकांना प्रशिक्षण देऊन १००० उद्योजक घडविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून शेतीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यावरही भर देण्यात आला.




या वेळी डॉ. यादव यांनी संशोधनासाठी राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान ६ ते ७ टक्के निधी उपलब्ध करून देण्याची गरज अधोरेखित केली. त्यामुळे संशोधनातील गुणवत्ता, सहभाग आणि परिणामकारकता वाढून भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले की, या कॉन्क्लेव्हमध्ये देशभरातील नामांकित शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, उद्योगतज्ज्ञ आणि शासकीय अधिकारी सहभागी झाले असून नवकल्पनांचा विकास, स्टार्टअप्स, संशोधनाचे व्यावसायिकीकरण आणि ज्ञानाधारित अर्थव्यवस्था यांवर सखोल चर्चा करण्यात येत आहे. कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी संशोधन, नवोन्मेष आणि उद्योग सहकार्य यावरील चर्चासत्रात सहभाग घेऊन मार्गदर्शन केले.

# शालेय स्तरावर पथनाट्याद्वारे वसुंधरा जनजागृतीला चालना

## ‘माझी वसुंधरा ६.०’ अंतर्गत वाकडमध्ये उपक्रम; स्वच्छता व पर्यावरणाचा संदेश

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या “माझी वसुंधरा ६.०” अभियानांतर्गत वाकड गावठाण परिसरात पथनाट्याच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता व वसुंधरा संवर्धनाची प्रभावी जनजागृती करण्यात आली.**



जागतिक हवामान दिनानिमित्त पि. चि. मनपा शाळा, वाकड गावठाण येथे सादर करण्यात आलेले पथनाट्य विद्यार्थ्यांसाठी ज्ञान, प्रेरणा आणि वसुंधरा प्रबोधनाचा अनोखा संगम ठरले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सहा.आयुक्त किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड, सहा. आरोग्य अधिकारी शांताराम माने, मुख्य आरोग्य निरीक्षक योगेश फल्ले आणि आरोग्य निरीक्षक कोमल फर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये पथनाट्याच्या माध्यमातून स्वच्छता, हवामान बदल आणि पर्यावरण संरक्षणाचे संदेश, हवामान बदलाची कारणे, त्याचे गंभीर परिणाम तसेच दैनंदिन जीवनात करता येणाऱ्या सोप्या उपाययोजनांची माहिती नाट्यरूप सादरीकरणातून देण्यात आली.

स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगताना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे ओला, सुका, घरगुती घातक व सॅनिटरी कचऱ्याचे विलगीकरण तसेच घरच्या घरी सेंद्रिय खत तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ माहितीच नव्हे, तर प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळाली.

शालेय स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता सवयी, कचरा व्यवस्थापनातील सुधारणा आणि पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारण्याबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होत आहे. लहान वयातच पर्यावरण संवर्धनाची जाणीव रुजविण्यासाठी अशा उपक्रमांची महत्त्वाची भूमिका असल्याचे मत सहा. आयुक्त किरणकुमार मोरे यांनी यावेळी व्यक्त केले.

> “ आजचे विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. त्यांच्यामध्ये स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत जीवनशैलीबाबतची जाणीव लहान वयातच निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे. पथनाट्यासारख्या प्रभावी माध्यमातून दिला जाणारा संदेश त्यांच्या मनावर दीर्घकालीन परिणाम करतो. ‘माझी वसुंधरा’सारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थी केवळ जागरूकच होत नाहीत, तर ते आपल्या कुटुंबात आणि समाजातही सकारात्मक बदल घडवून आणण्याचे कार्य करतात.
>
> - **डॉ. प्रदीप ठेंगल,** उप आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> “ माझी वसुंधरा ६.० अभियानाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाची जाणीव समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. विशेषतः शालेय स्तरावर अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि हवामान बदलाबाबतची जागरूकता निर्माण होत आहे. पथनाट्यासारख्या प्रभावी माध्यमामुळे विद्यार्थी केवळ संदेश आत्मसात करत नाहीत, तर ते आपल्या दैनंदिन जीवनातही त्याची अंमलबजावणी करण्यास प्रेरित होतात. यामुळे भविष्यात पर्यावरणपूरक आणि जबाबदार नागरिक घडण्यास मोठी मदत होणार आहे.
>
> - **विजयकुमार खोराटे,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# पुणे जिल्हाधिकाऱ्यांच्या ९६ तासांच्या आदेशाला केराची टोपली

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**घरपोच गॅस सिलिंडर ९६ तासांत देण्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश फक्त कागदावरच दिसून येत आहे. गॅस वितरकांकडून या आदेशाला अक्षरशः केराची टोपली दाखवल्याचे चित्र समोर आले आहे. शहरात नागरिकांना चार दिवस तर सोडाच, दहा-पंधरा दिवस उलटूनही सिलिंडर मिळत नसल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. विस्कळीत वितरण व्यवस्थेमुळे सर्वसामान्यांचे जगणे अक्षरशः विस्कळीत झाले आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून वितरण सुरळीत करावे आणि दोषी एजन्सींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा ९६ तासांत गॅस हा आदेश केवळ घोषणाबाजी ठरेल, असे म्हटले आहे.**





जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी १६ मार्च रोजी घेतलेल्या बैठकीत गॅस बुकिंगनंतर ९६ तासांत सिलिंडर घरपोच देणे बंधनकारक केले होते. थेट गोदामातून विक्रीवर बंदी घालत ओटीपीद्वारेच वितरण करण्याचे आदेश दिले होते. मात्र, आदेशानंतर आठवडा उलटूनही प्रत्यक्षात परिस्थितीत कोणताही सुधारणा झालेली दिसत नाही. शहरातील अनेक भागांत बुकिंगनंतर चार दिवस नव्हे, तर १० ते १५ दिवसांपर्यंत प्रतीक्षा करावी लागत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. दरम्यान, जिल्ह्यातील तब्बल ३८ लाखांहून अधिक गॅस ग्राहकांचा पुरवठा २२२ एजन्सींमार्फत केला जातो. मात्र, पिंपरी-चिंचवड पुरवठा विभागाकडेच शहरातील अधिकृत आणि अचूक आकडेवारी नसल्याचे समोर आल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### पार्किंगमध्ये चूल पेटवण्याची वेळ

गॅस टंचाईमुळे घराघरांत स्वयंपाकाचा प्रश्न गंभीर बनला आहे. व्यावसायिक गॅस बंद असल्याने छोटे हॉटेल व्यवसायही कोलमडल्याने नागरिकांना महागड्या जेवणावर अवलंबून राहावे लागत आहे. परिणामी, दैनंदिन खर्चातही मोठी वाढ झाली आहे. काही नागरिकांना गॅस संपल्याने पार्किंगमध्ये चूल पेटवून स्वयंपाक करावा लागत असल्याचे दिसून आले.